# नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान कायदा तथा न्यायाधीश, कामगार न्यायालय, सांगली यांचे न्यायालयात

## अर्ज (पी.जी.ए.) क्र. २/२०२५

CNR No. MHLC100000192025

**श्री. आण्णाप्पा यशवंत खरात** .. **अर्जदार**

**विरुध्द**

**दत्त इंडिया प्रा. लि.** .. **जाबदार**

## निशाणी यु-६ वर आदेश

**(दि. ०६/०८/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी कार्यकारी संचालक, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली यांना प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करून घेणेकरीता दाखल केला आहे.

**अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे** :

२. अर्जदार हे जाबदार यांचेकडे सेवेत असताना दि. ३१/०५/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीबाबतचा आदेश जाबदार यांनी दिल्यामुळे त्यांना पक्षकार केले आहे. जाबदार यांनी दि. १४/०७/२०२५ रोजी कैफियत दाखल करून जाबदार कारखाना हा सन २०१७ मध्ये वसंतदादा सहकारी साखर कारखाना लि. सांगली यांचेकडून भाडेतत्वावर चालविण्यास घेतल्याचे नमूद केले आहे. अर्जदार हे नोकरीस लागलेपासून सन २०१९ पर्यंत वसंतदादा सहकारी साखर कारखान्याकडे कामास होते. सबब, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली यांना प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणे जरूरीचे असल्याने अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

३. जाबदार यांनी निशाणी सी-६ ला म्हणणे दाखल करून अर्जास प्रखर विरोध केला आहे. सन २०१७ साली सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने सिक्युरीटायझेशन

कायद्याअंतर्गत निवीदेअन्वये कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास दिला आहे. अर्जदार यांची जाबदार यांचेकडील सेवा सन २०१९ ते सन २०२३ या कालावधीची आहे. सबब, अर्जदार हे उपदान रक्कम मिळणेस पात्र नाहीत. त्यामुळे, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली यांना प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणे गरजेचे नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. अर्जदार व जाबदार यांचेतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांच्या कथनाअन्वये अर्जदार हे सन २०१९ पर्यंत वसंतदादा सहकारी साखर कारखान्यामध्ये कामास होते. तद्नंतर ते जाबदार कारखान्याकडे जुन्या कामगारांबरोबर वर्ग झाले आहेत. सदरची बाब अर्जदार यांना जाबदार यांनी कैफियत दिलेनंतर ज्ञात झाली आहे. नोकरी लागलेपासून जाबदार यांचेकडे अर्जदार हे वर्ग होईपर्यंतची उपदानाची रक्कम वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली यांचेकडून मिळणेस अर्जदार हे पात्र असल्याने त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणेची विनंती अर्जदारतर्फे विधीज्ञ यांनी केली आहे. जाबदार यांनी दाखल केलेल्या कैफियतीतील कथनांचा विचार करता, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली यांचेकडे अर्जदार यांनी काही काळ नोकरी केली असल्याने त्यांना प्रस्तुत प्रकरणात आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणे न्यायोचित असल्याने अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## : **आ दे श** :

१. निशाणी यु–६ कडील अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत मुळ अर्जामध्ये प्रस्तावित दुरूस्ती करावी.

Digitally signed by SACHIN GOURIHAR KORE
Date: 2026.08.06 14:56:28 +0530

स्थळ : सांगली

( एस. जी. कोरे )
नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान कायदा
तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली

दिनांक : ०६/०८/२०२६